शासनाच्या सेवेतील लिपिक-टंकलेखक, इंग्रजी
टंकलेखक तसेच इंग्रजी लघुलेखकांना एतदर्थ
मंडळामार्फत घेण्यात येणारी टंकलेखन
परीक्षा सन २०१२ नंतर बंद करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय , क्र.- संकीर्ण-१००८/१०५३/प्र.क्र१३३/०८/२० ब
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दि. २०/६/२००९

**वाचा-** १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टलेप्र-१०८१/(सीआर-३४४)/ २०-ब, दिनांक - ६/५/९१.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मभावा-१०९३/प्र.क्र.१७/९३/२०ब, दि. ३०/३/१०९३.
३) शासन परीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण- १००८/१०५३/प्र.क्र.१३३/०८/२०-ब, दिनांक - ४/२/२००९.

**<u>प्रस्तावना :-</u>** शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक ६/५/१९९१ नुसार महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील लिपिक टंकलेखक, इंग्रजी टंकलेखक व इंग्रजी लघुलेखक यांना एतदर्थ मंडळाची मराठी लघुलेखनांची व मराठी टंकलेखनाची परीक्षा एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे प्रभावित होणारे कर्मचारी आज सर्वसाधारणपणे ४५ वर्षापुढील आहेत.

यापूर्वी मराठी टंकलेखन परीक्षा टंक यंत्रावर देताना अनेक अडचणी येत. शासकीय कार्यालयात आता कर्मचारी संगणकावर काम करीत असतात, त्यामुळे टंकलेखन यंत्र शोधून त्यावर सराव करणे कठीण होते. त्यासाठी प्रशिक्षण वर्ग लावावा लागत असे, व टंक यंत्रावर इन्स्क्रिप्ट की-बोर्डची सुविधा नसल्याने ६ महिन्याचे प्रशिक्षण घ्यावे लागत असे. या सर्व परिस्थितीचा विचार करुन यापुढे एतदर्थ मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन परीक्षा पूर्णपणे संगणकावर घेण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन दि. ४/२/२००९ च्या परिपत्रकान्वये घेतला व या पुढील परीक्षा संगणकावर घेण्यात येत आहेत.

एतदर्थ मंडळामार्फत घेण्यात येणारी टंकलेखन परीक्षा चार केंद्रावर वर्षातून दोनदा घेण्यात येते या परीक्षेचा लाभ शासकीय सेवेतील लिपिक - टंकलेखक, टंकलेखक / लघुलेखक घेत आहेत. गेल्या १० वर्षात या परीक्षेला एकूण १७०२७ एवढे कर्मचारी बसले होते. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टंकलेखन परीक्षेची गरज असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी संख्या वरचेवर कमी होत आहे. परीक्षा आयोजितकरण्यामुळे होणारा खर्च आणि परीक्षेला मिळणारा प्रतिसाद या बाबी विचारात घेऊन या परीक्षा कालांतराने बंद करणे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय अधिसूचना क्रमांक क्र. टलेप्र-१०८१/(सीआर-३४४)/ २०-ब, दि.६/५/९१ अन्वये शासकीय सेवेतील लिपिक टंकलेखक, इंग्रजी टंकलेखक व इंग्रजी लघुलेखक यांना अनिवार्य करण्यात आलेली एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखन परीक्षा ऑक्टोबर २०१२ मध्ये शेवटची परीक्षा आयोजित झाल्यानंतर अशी परीक्षा घेण्याचे बंद करण्यात येईल.

राज्य सेवेतील सर्व लिपिक-टंकलेखक, इंग्रजी टंकलेखक व इंग्रजी लघुलेखक यांनी या बाबीची नोंद घ्यावी. जे लिपिक-टंकलेखक, इंग्रजी लघुलेखक / टंकलेखक अद्यापही मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत, त्यांनी सन २०१२ पर्यत ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा होणाऱ्या वित्तीय नुकसानीला ते स्वतःच जबाबदार राहतील. एतदर्थ मंडळाची अशी टंकलेखन परीक्षा यापुढे संगणकावरच घेण्यात येईल. मात्र जे कर्मचारी साधारणपणे ५५ वर्षे वयोमर्यादे पुढील असतील त्यांनी एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन परीक्षेबाबतचा त्यांचा विकल्प प्रत्येक वर्षी दि. १५ ऑगस्ट पर्यंत विभाग प्रमुखांमार्फत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे नोंदविल्यास त्यांना मराठी टंक यंत्रावर परीक्षा देण्याचा विकल्प खुला असेल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०६२०१७१४४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**(अ.ना.कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा. राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
प्रबंधक अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
महालेखापाल(लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
विभागीय सहायक भाषा संचालक, नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णय त्यांनी आपापल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणावा